मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची पुनर्रचना आणि एकछत्री नियंत्रणानूसार उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रा) वन विभाग परतवाडा व वनपरिक्षेत्र अधिकारी सुसर्दा या पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०१९/प्र.क्र.३६/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १६ एप्रिल, २०१९

<u>संदर्भ :-</u> १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-मकोनि-१०००/प्र.क्र.४४/०५,कोषा-प्र.५ दि. ०४.०१.२००६.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.डब्ल्यूएलपी-०७१८/प्र.क्र.२६८/फ-१, दि.०४.१२.२०१८.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.१९/९३८/२०१८-१९, दि.१४.०३.२०१९

<u>प्रस्तावना -</u>

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्यांची देयके फेब्रुवारी-२००६ पासून इतर विभागाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच कोषागारातून पारित करण्याबाबत वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ दि.०४.०१.२००६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १३ नुसार व नियम १५(३) नुसार विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची यादी महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येते. यानुसार वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार विभागातील आहरण व संवितरण आधिकाऱ्यांच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र.३ येथील दि.१४.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्यानूसार मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती यांच्या अधिपत्याखालील उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रा) वन विभाग परतवाडा व वनपरिक्षेत्र अधिकारी सुसर्दा या पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने सदरहू पदनामास "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महसूल व वन विभागाच्या संदर्भ-क्र.२ येथील दि.०४.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे पुनर्रचना आणि एकछत्री नियंत्रणानूसार मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती अंतर्गत नविन वन्यजीव विभाग/वनपरिक्षेत्राची निर्मीती करण्यात आलेली आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाने संदर्भ क्र.३ येथील दि.१४.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या दि.०४.०१.२००६ रोजीच्या शासन निर्णयानूसार **उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रा) वन विभाग परतवाडा** या पदनामास खालील नमुद १ ते ६ बाबींकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

१) अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याचे देयके कोषागारातून पारित करुन घेणे.
२) शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान आहरण व संवितरण अधिकारी (वनपरिक्षेत्र अधिकारी, मुख्य लेखापाल) यांना वाटप करणे. (वेतनेत्तर बाबींचा खर्च)
३) शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान संयुक्त वनव्यवस्थापन समितींना वाटप करणे.
४) वेतन व भत्ते या व्यतिरिक्त इतर वेतनेत्तर खर्चाची देयके पारित करुन संवितरीत करणे.
५) दरमहा वेतनेत्तर खर्चाचा मासिक रोखलेखा महालेखाकार यांच्याकडे सादर करणे व महालेखाकार यांनी तो रोखलेखा स्विकारणे.
६) ८७८२ वनभरणा व ८७८२ धनादेश आहरण सादर करणे.

तसेच **वनपरिक्षेत्र अधिकारी, सुसर्दा** या पदांस परिक्षेत्र कार्यालयांतर्गत आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व इतर भत्त्याची देयके कोषागार कार्यालयास सादर करण्याकरिता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

वनवृत्त कार्यालय	**कार्यरत आहरण व संवितरण अधिकारी पदनाम व आहरण व संवितरण क्र.**	**आहरण व संवितरण अधिकारी घोषित करावयाचे पदनाम**	**मुख्यालय ठिकाण**	**जवळचे उपकोषागार कार्यालय व सांकेतांक क्र.**
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती.	उपवनसंरक्षक, पश्चिम मेळघाट वन विभाग परतवाडा ६१०२००१०९१	उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रा) वन विभाग,परतवाडा	परतवाडा	उपकोषागार कार्यालय, अचलपूर (६१०२)
	वनपरिक्षेत्र अधिकारी ढाकणा ६१०७०२१२००	वनपरिक्षेत्र अधिकारी, सुसर्दा	ढाकणा	उपकोषागार कार्यालय, धारणी (६१०७)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१९०४१६११२८१८५४१९ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b8040551 4f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a3 5400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.04.16 11:32:31 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति –

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर.

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक व्याघ्र प्रकल्प, मेळघाट, अमरावती

४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती.

५. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.

(त्यांना विनंती करण्यात येते कि,महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १५(२) व १५ (३) नुसार उपरोक्त अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याची पुढील कार्यवाही करण्यात करावी.)

६. संचालक, लेखा व कोषागार, संचालनालय, मुंबई.

७. वरीष्ठ लेखा कोषागार अधिकारी, नागपूर / मुंबई.

८. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.

९. सहसंचालक, (तांत्रिक) लेखा व कोषागार, मुंबई.

१०. वित्त विभाग, कार्यासन कोषा. प्र-५, मंत्रालय, मुंबई.

११. निवड नस्ती (फ-२), महसूल व वन विभाग.